नि. फौ.ख.क्रं. ५/२०१८
शासन वि. अनिल
नि.क्र. ५०/क

<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०२ यांची शपथेवर जबानी</u>

| | | |
|---|---|---|
| नाव | : | बाबासाहेब भिमराव म्हस्के |
| वय | : | ४२ वर्षे |
| व्यवसाय | : | मजुरी |
| राहणार | : | दादेगाव ता. आष्टी जि. बीड |

<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत</u>

१. मी कुटुंबीयासोबत दादेगाव येथे राहतो. फिर्यादी माझी वहिणी आहे. आरोपी शेजारी राहत असल्यामुळे ओळखतो. आरोपी क्र. २ हजर आहे. घटना दि. २०/०८/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजण्याच्या सुमारास घडली. पावसाचे पाणी दारात आल्यामुळे आई आरोपींना विचारणा करण्यासाठी गेली असता, त्याचा राग आल्याने आरोपींनी भावाला, आईला शिवीगाळ केली. फिर्यादी भांडणे सोडवण्यासाठी गेली असता, आरोपी क्र. १ ने जवळ असलेल्या पाट्यावरील वरंवटा घेऊन फिर्यादीच्या नाकावर मारले. त्यानंतर फिर्यादी बेशुध्द पडली. त्यानंतर आरोपी पळुन गेले. मी, फिर्यादी व भाऊ अंभोरा पोलीस स्टेशन येथे गेलो. पोलीसांनी पत्र देऊन आष्टी येथे सरकारी दवाखान्यात पाठवले. आष्टी येथे टाके टाकले व पुढील उपचारासाठी अ.नगर येथे सरकारी दवाखान्यात पाठवले. तेथे पुढील २ दिवस उपचार घेतले. त्यांनी क्ष–किरण काढला. त्यामध्ये डॉक्टरांना मार लागल्याचे निष्पन्न झाले. दि. २२/०८/२०१७ नि. ४८ प्रमाणे फिर्याद दिली.

०२. आरोपीने ज्या वरंवट्याने मारहाण केली होती ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. पोलीसांनी घटनेबाबत चौकशी करुन जबाब नोंदवला. मला पंचनामा करण्यासाठी श्री. आघाव पोलीसांनी बोलावले होते. दुसरे पंच भाऊसाहेब गिते हजर होते. पोलीसांना घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. घटनास्थळ घर आहे. पुर्वेस- गयाबाई म्हस्के यांचे घर, पश्चिमेस व दक्षिणेस- लक्ष्मण गरुड यांचे घर व उत्तरेस ग्रामपंचायतची मोकळी जागा आहे. पोलीसांनी माझ्यासमक्ष वरंवटा जप्त केला. त्यानंतर जप्ती व घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारास पंचनामा दाखवला. त्यातील मजकुर व नकाशा खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **नि. पी.५१/ पी.डब्ल्यु. २** देण्यात येते. साक्षीदारास जी.एम.पी. क्र. २३/२०२५ मध्ये दगडी वरंवटा दाखवण्यात आला. साक्षीदाराने तोच असल्याचे ओळखले. मुद्देमालास **नि. एम.ओ. -१** देण्यात आला आहे. मुद्देमालाच्या लेबलवर माझी सही आहे. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो काढले. आता मला ते फोटो नि. एम.ओ. २ ते ७ दाखवण्यात आले. सदर फोटो तेच आहेत.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी.व्ही. दाणी यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

०३. माझे १२ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. माझ्या घरात एकुण ९ व्यक्ती आहेत. सर्वजण एकत्र

राहतो. दोन्ही आरोपी शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा कडा येथे आनंदराव धोंडे महाविद्यालय येथे प्राध्यापक आहे. अमान्य की, तो कडा येथे राहतो. अमान्य की, घटनेदिवशी आरोपी क्र. २ नोकरीवर होता. हे म्हणणे खरे आहे की, २०१७ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरोपी क्र. २ आणि माझा भाऊ संतोष म्हस्के विरोधात उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या निवडणुकीत माझ्या भावाचा पराभव झाला. अमान्य की, त्यानंतर आमच्यामध्ये वाद सुरु झाले. अमान्य की, घटनेच्या वेळेस पाऊस नव्हता. अमान्य की, पावसाचे पाणी घरासमोरुन निघुन जाते. अमान्य की, सरतपासात नमुद घटना घडली नाही. अमान्य की, फिर्यादीला मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. मुद्देमाल एम.ओ. १ चे वजन सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वरंवट्याने मारल्यास माणुस मरु शकतो.

४. अमान्य की, त्यामुळे फिर्यादीस झालेली जखम होऊ शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कडा येथे सरकारी दवाखाना आहे. हे म्हणणे खरे आहे की, दादेगाव पासुन कडा ९ कि.मी. व आष्टी २५ कि.मी. अंतर आहे. कडा येथे सायंकाळी दवाखाना बंद असल्याने आष्टी येथे आलो. अमान्य की, आष्टी येथे नातेवाईक असल्याने इथे उपचार केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना फिर्यादबाबत भाऊ संतोष याने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, संतोषवर यापुर्वी मारामारीच्या फौजदारी केसेस होत्या. भाऊ संतोषवर कलम ३०७ प्रमाणे गुन्हा असलेबाबत माहिती नाही. अमान्य की, त्याला न्यायालयीन कामकाजाबाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गयाबाई, संतोष, भाऊसाहेब हे घरातील साक्षीदार आहेत. अमान्य की, आष्टी येथील डॉ. गुट्टे हे परिचयाचे आहेत. त्यांचे खाजगी दवाखाना असलेबाबत माहिती नाही. आमच्या शेजारी इतर २ घरे आहेत. गावाची लोकसंख्या २५०० आहे.

५. अमान्य की, पंचनामा पोलीस स्टेशनला केला. अमान्य की, पोलीस स्टेशनला जबाब नोंदवले. जबाब कोणत्या पोलीसांनी नोंदवले हे सांगता येत नाही. घराचे फोटो एम.ओ. २ ते ७ आघाव पोलीसांनी घेतले. अमान्य की, फोटोमध्ये घटनास्थळाचा बोध होत नाही. अमान्य की, सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे. अमान्य की, आरोपी क्र. २ चा उत्कर्ष सहन होत नाही व आरोपी क्र. १ साथ देत नाही म्हणुन खोटी केस केली. अमान्य की, खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र घेतले. अमान्य की, अ.नगर येथे उपचार घेतलेबाबत पुरावा नाही. अमान्य की, अभिलेखावर क्ष-किरण व कागदपत्रे दाखल नाहीत. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.१३.११.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.11.13 17:03:15 +0530

श्री. एम. आर.बडाख

**न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी**